# “महाराष्ट्रातील मराठा समाजाची सामाजिक स्थिती :

## ऐतिहासिक परिवर्तन, शैक्षणिक आव्हाने आणि समकालीन सामाजिक वास्तव”

संशोधक विद्यार्थी
अमोल कैलासराव देशमुख
(समाजशास्त्र विभाग)

मार्गदर्शक
डॉ.बी.बी. डोंगरे
प्राचार्य
मोरेश्वर महाविद्यालय भोकरदन
ता. भोकरदन जि. जालना

**1.प्रस्तावना**

महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात मराठा समाज हा एक महत्त्वाचा सामाजिक घटक आहे. ग्रामीण समाजरचना, कृषी अर्थव्यवस्था, स्थानिक नेतृत्व, लष्करी परंपरा आणि राजकीय सहभाग या विविध क्षेत्रांमध्ये या समाजाचा प्रभाव राहिला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यनिर्मितीने महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक इतिहासाला महत्त्वपूर्ण दिशा दिली. स्वराज्यनिर्मितीच्या प्रक्रियेत स्थानिक समाजघटकांचे संघटन, किल्लेव्यवस्था, महसूल प्रशासन, लष्करी संघटन आणि ग्रामीण समाजाशी संबंध या बाबींना महत्त्व प्राप्त झाले. पुढे पेशवाई, ब्रिटिश राजवट आणि स्वातंत्र्योत्तर काळामध्ये मराठा समाजाच्या सामाजिक भूमिकेत बदल होत गेले.आधुनिक काळात शिक्षण, शहरीकरण, औद्योगिकीकरण, तंत्रज्ञान आणि रोजगाराच्या बदलत्या स्वरूपामुळे मराठा समाज पारंपरिक कृषी व्यवसायाबरोबरच शिक्षण, प्रशासन, उद्योग, व्यवसाय आणि सेवा क्षेत्रात प्रवेश करीत आहे. त्याचवेळी शिक्षणातील असमानता, रोजगाराच्या मर्यादा, कृषीवरील अवलंबित्व, युवकांच्या वाढत्या अपेक्षा आणि सामाजिक धोरणांशी संबंधित प्रश्नही चर्चेत आहेत. म्हणून मराठा समाजाच्या सामाजिक स्थितीचा अभ्यास केवळ ऐतिहासिक दृष्टिकोनातून न करता वर्तमान सामाजिक परिवर्तनाच्या संदर्भात करणे आवश्यक आहे.

**2.संशोधनाची उद्दिष्टे**

या अभ्यासाची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत :

1. मराठा समाजाच्या सामाजिक स्थितीचा ऐतिहासिक आढावा घेणे.
2. सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तनाचा अभ्यास करणे.
3. शिक्षणाच्या स्थितीचे विश्लेषण करणे.
4. स्त्रियांच्या सामाजिक स्थितीतील बदलांचा अभ्यास करणे.
5. धर्म, श्रद्धा, परंपरा आणि लोकसंस्कृतीचा सामाजिक जीवनावर होणारा परिणाम समजून घेणे.
6. ग्रामीण व शहरी सामाजिक परिस्थितीतील फरकांचा अभ्यास करणे.
7. युवकांच्या शिक्षण व रोजगाराशी संबंधित समस्यांचा अभ्यास करणे.
8. सामाजिक गतिशीलता आणि आधुनिकतेच्या प्रक्रियेचे विश्लेषण करणे.
9. समकालीन सामाजिक प्रश्नांच्या संदर्भात आवश्यक उपाययोजना सुचविणे.